PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 3, ISSUE 5

# धुळे शहरातील घरेलू कामगारांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास

**कु. पौर्णिमा क्षीरसागर**
१७, शिवशंकर कॉलनी, चित्तोड रोड,
धुळे ४२४००२.
धुळे. महाराष्ट्र भारत

**डॉ. के. बी. दिवटे**
उप प्राचार्य,
मा. ध. पालेशा वाणिज्य
महाविद्यालय, धुळे.
महाराष्ट्र भारत

**गोषवारा:**

घरेलू कामगार हा रोजगार वाढीचा परिणामतः अर्थव्यवस्थेच्या विकासाचा एक महत्वाचा घटक बनलेला आहे. वाढत्या शहरीकारणामुळे आणि विभक्त कुटुंब पद्धतीमुळे घरेलू कामगारांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातूनच असंघटीत अशा घरेलू कामगारांबाबत मानवी तस्करीच्या आणि त्यांच्या शोषणाच्या विविध घटना समोर येत आहेत. यामुळे या घरेलू कामगारांची सामाजिक आणि आर्थिक स्थिती सुधारणे आणि त्यांना कायद्याचे संरक्षण मिळणे आज आवश्यक बाब बनली आहे. यासाठी राज्यनिहाय व शहरनिहाय घरेलू कामगारांचा अभ्यास होणे आवश्यक आहे. याच हेतूने महाराष्ट्र राज्यातील धुळे शहरातील घरेलू कामगारांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास केला आहे.

**मुख्य शब्द:** घरेलू कामगार, घरमालक, नियक्ती संस्था, नोंदणी, कायद्यातील तरतुदी, सामाजिक स्थिती, आर्थिक स्थिती, इ.

---

## प्रस्तावना:

घरेलू कामगारांची प्राचीन इतिहासातही नोंद आढळते. त्याकाळी त्यांना “घरगडी” किंवा “नोकर” असे संबोधले जायचे. देशाचा आर्थिक विकास व शहरीकरण यामुळे शहरातील रोजगाराच्या संधी वाढल्या. घरातील स्त्री नोकरीसाठी घराबाहेर पडू लागली.

यामुळे घरेलू काम करण्यासाठी कामगारांची गरज भासू लागली. यातूनच घरेलू कामगारांना दिवसेंदिवस मागणी वाढू लागली. आणि अशिक्षित व अकुशल स्री वर्गासाठी उत्पन्नाचे एक मुख्य साधन म्हणून हे क्षेत्र उदयास आले.

कॅथोलिक बायशॉप परिषदेच्या अहवालानुसार (१९८०), भारतातील १२ मोठ्या शहरांमधील घरेलू कामगारांमध्ये ७८% महिला कामगार असून त्यातील मुंबई शहरामध्ये हे प्रमाण ९०% इतके होते. परंतु, कामगार विभागाने (१९८२) दिल्लीमधील पूर्णवेळ घरेलू कामगारांच्या केलेल्या सर्वेक्षणानुसार, घरेलू काम या क्षेत्रात स्री किंवा पुरुष यापैंकी कोणाचीही मक्तेदारी नव्हती. श्रमशक्ती संघटनेच्या अहवालानुसार (१९८८), एकूण २३ लाख घरेलू कामगारांपैंकी १६.८ लाख कामगार ह्या महिला होत्या. तर, राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेच्या (NSSO) अहवालानुसार (२००४-०५), शहरी भागात काम करणाऱ्या एकूण ४७.५ लाख घरेलू कामगारांपैंकी ३०.५ लाख महिला कामगार होत्या. यावरून, महिला कामगारांसाठी घरेलू काम हे क्षेत्र दिवसेंदिवस वाढत असून या क्षेत्रात महिलांचा सहभागही दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येते.

**संकल्पना:**

**१) घरेलू कामगार:**

घरेलू कामगार कल्याण आणि सामाजिक सुरक्षितता कायदा २०१० नुसार, "घरेलू कामगार म्हणजे अशी व्यक्ती जी मालकाच्या घरी घरेलू काम करण्यासाठी स्वतः अथवा मध्यास्तांमार्फत, तात्पुरत्या कालावधीसाठी अथवा कायम स्वरूपी अथवा करार पूर्ण होईपर्यंत, पूर्णवेळ अथवा अर्धवेळेसाठी रुजु होते आणि त्या बदल्यात घर मालकाकडून घरेलू कामगाराला पैसे अथवा वस्तूच्या स्वरुपात मोबदला मिळतो." या संकल्पनेत मूळ कामगाराऐवजी तात्पुरत्या काळासाठी मूळ कामगाराच्या संमतीने नियुक्त केलेल्या कामगाराचाही समावेश होतो.

घरेलू कामांमध्ये धुणं धुणे, भांडी घासणे, लादी झाडणे व पुसणे, घराची इतर साफसफाई करणे, स्वयंपाक करणे, लहान मुले किंवा आजारी किंवा वृध्द किंवा अपंग व्यक्ती

इ. ची काळजी घेणे, घरगुती बागकाम करणे आणि घर मालकाच्या वाहनाचा चालक असणे इत्यादी कामांचा समावेश होतो.

कामाच्या वेळेनुसार व स्वरूपानुसार घरेलू कामगारांचे पुढील दोन प्रकार पडतात.

**अ) निवासी कामगार:**

जो घरेलू कामगार पूर्णवेळ एकाच मालकाकडे कामाला असतो आणि रोज काम संपल्यावर स्वतःच्या घरी ण जाता घर मालकाच्याच घरी अथवा घर मालकाने दिलेल्या जागेत राहतो, त्याला “निवासी घरेलू कामगार” असे म्हणतात.

**ब) अनिवासी कामगार:**

जो घरेलू कामगार रोज काम संपल्यावर स्वतःच्या घरी परत जातो, त्याला “ अनिवासी घरेलू कामगार” असे म्हणतात. हे कामगार दोन प्रकारचे असतात.

**i) पूर्णवेळ कामगार:**

जो घरेलू कामगार रोज फक्त एकाच घरात विशिष्ठ वेळेसाठी अथवा पूर्ण दिवस घरेलू काम करतो आणि रोज काम संपल्यावर स्वतःच्या घरी जातो, त्याला “पूर्णवेळ घरेलू कामगार” असे म्हणतात.

**ii) अर्धवेळ कामगार:**

जो घरेलू कामगार एक अथवा जास्त घरांमध्ये रोज ठराविक वेळेसाठी घरेलू काम करतो, त्याला “अर्धवेळ घरेलू कामगार” असे म्हणतात.

**२) घर मालक:**

घर मालक म्हणजे “अशी व्यक्ती जी घरेलू कामगाराला स्वताच्या घरी कामाला ठेवते आणि त्या बदल्यात तिला पैसे अथवा वस्तूच्या स्वरुपात मोबदला देते”.

**३) नियुक्ती संस्था:**

नियुक्ती संस्था म्हणजे “अशी कोणतीही खाजगी अथवा सार्वजनिक संस्था अथवा संघटना, जी एक किंवा अनेक व्यक्ती चालवितात आणि तिचा मुख्य उद्देश घरेलू कामगारांना नोकरी उपलब्ध करून देणे व घर मालकांना घरेलू कामगार पुरविणे हा असतो”.

नियीक्ती संस्थांना ‘दुकाने व अस्थापने कायदा १९५३ ‘ अन्वाये नोंदानी करणे अनिवार्य आहे. या संथांनी दर सहा महिन्यांनी घरेलू कामगाराचे ठिकाण, घर मालकाची संपूर्ण माहिती, कामगाराचे वेतन व वेतन देण्याची पद्धत, कामाचे तास, कामाचे स्वरूप, कामाचा अथवा कराराचा कालावधी आणि कराराची प्रत इत्यादी सर्व माहिती राज्य कामगार विभागाकडे पाठविणे आवश्यक आहे.

**घरेलू कामगारांची नाव नोंदणी:**

घरेलू कामगार कल्याण आणि सामाजिक सुरक्षितता कायदा २०१० नुसार, ज्या व्यक्तीचे वय १८ वर्षे ते ६५ वर्षे या दरम्यान असेल आणि मागील १२ महिन्यांमध्ये त्या व्यक्तीने किमान ९० दिवस घरेलू काम केलेले असेल, अशी व्यक्ती लाभार्थी म्हणून नोंदणी करण्यास पात्र असते. प्रत्येक घर कामगाराने व घर मालकाने किंवा मध्यस्थ संस्थेने घर कामगाराने काम सुरु केल्यापासून एक महिन्याच्या आत घर कामगाराची नोंदणी जिल्हा अधिकाऱ्याकडे करणे आवश्यक आहे. जेव्हा एखादा घर कामगार एकापेक्षा अधिक घरांमध्ये अर्धवेळ काम करत असेल आणि तो नियुक्ती संस्थांशी निगडीत नसेल, तेव्हा त्या घर कामगाराचे कर्तव्य असते कि त्याने स्वतःची नोंदणी जिल्हा कार्यालयात करावी. परंतु, जर घर कामगार नियुक्ती संस्थांशी निगडीत असेल तर, त्या नियुक्ती संस्थांची जबाबदारी असते कि त्यांनी त्या घर कामगाराची नोंदणी जिल्हा कार्यालयात करावी.

दर दोन वर्षांनी नोंदणी प्रमाणपत्राचे नुतनीकरण करणे व फी भाराने आवश्यक आहे. घरेलू कामगारांना कायद्यांतर्गत नोंदणी करण्यासाठी खालील सर्व कागदपत्रांच्या प्रत्येकी तीन साशांकित प्रती नोंदणीच्या अर्जासोबत जोडणे आवश्यक असते.

१) पासपोर्ट आकाराचे तीन फोटो
२) रहिवाशी दाखला
३) शिधापत्रिका
४) आधार कार्ड व मतदान कार्ड

५) जन्म तारखेचा पुरावा
६) राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक
७) मालकाचे संमतीपत्र
८) अर्जाची फी रु. ९०/- (एक वर्षासाठी)

नाव नोंदणी केलेल्या घरेलू कामगारांना खालील लाभ मिळतात:

१) राष्ट्रीय स्वस्थ विमा योजना
२) जनश्री विमा योजना
३) सन्मान धन योजना
४) मुलांच्या शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य (दोन मुलांसाठी)
५) महिला कामगाराला प्रसूती लाभ
६) लाभार्थीच्या वारसास अंत्यविधीसाठी आर्थिक सहाय्य
७) लाभार्थी व त्याच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींसाठी वैद्यकीय खर्चाची तरतूद
८) घर कामगार कल्याण निधी
९) महाराष्ट्र घर कामगार कल्याण मंडळाने वेळोवेळी निश्चित केलेले इतर लाभ,इ.

**घरेलू कामगार कायद्यांतर्गत तरतुदी:**

घरेलू कामगार कायद्यामध्ये घरेलू कामगारांसाठी पुढील काही तरतुदी करण्यात आल्या आहेत.

**१) कामाचे तास:**

प्रत्येक मालकाने आपल्या पूर्णवेळ घरेलू कामगाराला ८ तासांपेक्षा जास्त काम सांगितल्यास, ज्यादा तासाचे नियमित पगाराच्या दाराच्या दुप्पट दराने ज्यादा मोबदला द्यावा. तसेच, जास्तीचा वेळ पकडून रोज १० तासांपेक्षा जास्त वेळ मालकाने कामगाराकडून काम करवून घेऊ नये. प्रत्येक घर मालकाने आपल्या निवासी घरेलू कामगाराकडून रोज १२ तासांपेक्षा जास्त वेळ काम करवून घेऊ नये.

**२) विश्रांतीची वेळ:**

कामगारने सलग चार्तास काम केल्यानंतर मालकाने त्यास एक तासाची विश्रांती द्यावी. तसेच प्रत्येक मालकाने आपल्या घरेलू कामगाराला जेवणासाठी एक तास विश्रांती द्यावी.

**३) सुट्टी:**

प्रत्येक मालकाने आपल्या घरेलू कामगाराला आठवड्यातून एक दिवस सुट्टी द्यावी व ज्यांना अशा प्रकारे साप्ताहिक सुट्टी देणे शक्य नसेल त्यांनी त्या दिवसाचा ज्यादा पगार आपल्या कामगाराला द्यावा. तसेच पूर्णवेळ काम करणाऱ्या व निवासी घरेलू कामगाराला वर्षातून एकदा स्वतःच्या गावी जाता यावे यासाठी किमान १५ दिवसांची भरपगारी राजा द्यावी. आणि घरेलू कामगाराला प्रवास खर्चासाठी म्हणून काही रक्कम मालकांनी द्यावी.

**४) सानुग्रह अनुदान:**

किमान एक वर्ष सेवा झाली असेल तर, दिवाळीच्या वेळी मालकांनी कामगाराला एक महिन्याचा पगार सानुग्रह अनुदान म्हणून द्यावा.

**५) वैद्यकीय खर्च:**

घरेलू कामगाराला औषधोपचारासाठी कमीत कमी काही ठराविक रक्कम मालकांनी द्यावी किंवा त्यांचा औषधांचा खर्च करावा.

**६) पगार:**

प्रत्येक मालकाने आपल्या घरेलू कामगाराला किमान पगार द्यावा.

**७) पेंशन:**

प्रत्येक घर मालकाने आपल्या घरेलू कामगाराची नोंदणी पेंशन योजनेत करावी आणि कामगाराच्या पगाराच्या १०% इतकी रक्कम नियमितपणे कामगाराच्या नावाने पेंशन फंडात जमा करावी. असे न केल्यास मालकाला रु. २५ हजार ते रु. एक लाख पर्यंत दंड होऊ शकतो.

**संशोधनाचे महत्व:**

प्रस्तुत संशोधनाचा केंद्रबिंदू हा घरेलू कामगांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास आहे. देशातील उत्पादित रोजगार वाढवण्यात घरेलू कामगार महत्वाची भूमिका पार पडतात. परंतु, समाजाच्या दृष्टीने घरेलू कामगार सतत दुर्लक्षित राहिलेले आहे. घरेलू काम हे मानवी आरोग्याच्या दृष्टीने खूप महत्वाचे आहे. या सर्व गोष्टींचा विचार केल्यास, घरेलू कामगारांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्याची गरज असल्याचे स्पष्ट होते. घरेलू कामगारांकडे समाजाचे व सरकारचे लक्ष वेधून या कामगारांच्या कष्टाला समकक्ष मोबदला मिळावा, त्यांच्या काष्ठाची समाजाने नोंद घ्यावी, ह्या हेतूने हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**संशोधनाची गृहुतके:**

१) घरेलू कामगारांना मिळणारा मोबदला त्यांच्या कामाच्या मानाने अल्प आहे.

२) बहुतेक घरेलू कामगार हे अशिक्षित व अल्पशिक्षित आहेत.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१) घरेलू कामगारांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

२) संशोधनातून आलेल्या निष्कर्षाच्या आधारे शिफारशी करणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत लघु संशोधनासाठी धुळे शहरातील ३५ घरेलू कामगारांची निवड “सरल यादृक्छिक नमुना निवड पद्धतीने” केली आहे.

**तथ्य संकलन:**

**१) प्राथमिक तथ्य:**

मुलाखत अनुसुचीच्या मदतीने घर कामगारांबाबत प्राथमिक तथ्य संकलित केले. कामगारांमधील कमी साक्षरतेचे प्रमाण, तसेच प्रश्नावली भरून देण्याची उदासीनता या

बाबी विचारात घेऊन प्रश्नावली ऐवजी मुलाखत अनुसुचीच्या मदतीने तथ्य संकलित करण्यात आले.

**२) दुय्यम तथ्य:**

दुय्यम सामग्रीच्या स्वरूपातील तथ्य संकलित करण्यासाठी शासकीय विविध अहवाल, शासकीय राजपत्र, प्रकल्प अहवाल, पुस्तके, मासिके, संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे इत्यादींचा वापर केलेला आहे.

**३) सामग्री संस्करण व विश्लेषण:**

मुलाखत अनुसुचीच्या आधारे संकलित केलेल्या तथ्यांवर प्रक्रिया करून सारणी, आलेख, सूत्र, टक्केवारी, सरासरी यासंख्याशास्त्रीय साधनांच्या आधारे स्त्रोतनिहाय विश्लेषण केले आहे.

**संशोधनाची मर्यादा:**

१) हे संशोधन धुळे शहरातील निवडक घरेलू कामगारांपुरते मर्यादित आहे.

२) अधिकृत आकडेवारी उपलब्ध होण्यासंबंधी मर्यादा असल्यामुळे ही सदर संशोधनाची देखील मर्यादा आहे.

**घरेलू कामगारांचा सामाजिक अभ्यास:**

धुळे शहरातील घरेलू कामगारांचा सामाजिक अभ्यास हे या अभ्यासाचे एक प्रमुख उद्दिष्ट आहे. घरेलू कामगारांचे मूळ ठिकाण, धर्म व जात, वयोगट, घर कामाचे स्वरूप, मालकाकडून त्यांना मिळणारी वागणूक, या कामास समाजात असणारी प्रतिष्ठा इत्यादी सामाजिक घटकांचे तपशीलवार विश्लेषण केले आहे.

**१) मुळ प्रदेशानुसार विभागणी:**

संशोधनासाठी निवडलेले सर्व घरेलू कामगार ह्या स्त्री कामगार असल्याचे प्रथम पाहणीत दिसून आले. हे कामगार स्थानिक आहेत कि दुसऱ्या ठिकाणाहून स्थलांतरित झाले आहेत, याविषयी माहिती तक्ता क्र. १ मध्ये दिलेली आहे.

तक्ता क्र.१ मुळ प्रदेशानुसार विभागणी

| अ.क्र. | मुळ प्रदेश | कामगारांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | धुळे शहर | ३५ | १०० |
| २ | इतर | ०० | ०० |
| | **एकूण** | **३५** | **१००** |

संदर्भ: क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. १ वरून असे दिसून येते कि, संशोधनासाठी निवडलेल्या सर्व (१००%) घरेलू कामगारांची कुटुंबे स्थानिक असून एकाही घरेलू कामगाराचे कुटुंब बाहेरून धुळे शहरात स्थलांतरित झालेले नाही.

## २) जातीनुसार विभागणी:

घरेलू कामांना समाजात फारशी प्रतिष्ठा नसून हे काम शक्यतो मागास जातीतील स्त्रीयांकडून केले जाते. संशोधानासाठी निवडलेले सर्व घरेलू कामगार ह्या स्त्रीया असून त्या सर्व हिंदू धर्मातील आहेत. त्यांची जातवार विभागणी तक्ता क्र.२ मध्ये दिलेली आहे.

तक्ता क्र.२ जातीनुसार विभागणी

| जातीचा प्रकार | ओपन | ओ.बी.सी. | एस.बी.सी. | एस.सी. | एस. टी. | एन.टी. | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **कामगारांची संख्या** | ०४ | ०५ | ०१ | ०३ | १० | १२ | **३५** |
| **शेकडा प्रमाण** | ११ | १४ | ०३ | ०९ | २९ | ३४ | **१००** |

संदर्भ: क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. २ वरून असे दिसून येते कि, प्रगत जातीतील घरेलू कामगारांचे प्रमाण खूप कमी (११%) असून मागास जातीतील कामगारांचे प्रमाण सर्वाधिक (८९%) आहे. मागास जातीतील कामगारांमध्ये एन.टी. जातीच्या कामगारांचे प्रमाण सर्वात जास्त (३४%) असून एस.बी.सी. जातीतील कामगारांचे प्रमाण सर्वात कमी (०३%) आहे.

### ३) वयोगटानुसार विभागणी:

घरेलू काम हे तुलनेने कमी शारीरिक कष्टाचे असून अशी कामे मुख्यत: अशिक्षित किंवा अल्पशिक्षित आणि अकुशल स्त्रीया कुटुंबाला आर्थिक आधार म्हणून परिस्थितीप्रमाणे करताना दिसतात. त्यांची वयोगटानुसार विभागणी तक्ता क्र. ३ मध्ये केलेली आहे.

**तक्ता क्र.३ वयोगटानुसार विभागणी**

| वयोगट (वर्षे) | १८-३५ | ३५-५० | ५१-६५ | एकूण |
|---|---|---|---|---|
| कामगारांची संख्या | १४ | १५ | ०६ | ३५ |
| शेकडा प्रमाण | ४० | ४३ | १७ | १०० |

संदर्भ: क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. २ वरून असे लक्षात येते कि, संशोधनासाठी निवडलेले घरेलू कामगार १८ ते ६५ वर्षे वयोगटातील आहेत. ३५ ते ५० वयोगटातील कामगारांचे प्रमाण सर्वात जास्त (४३%) असून ५१ ते ६५ वर्षे वयोगटातील कामगारांचे प्रमाण सर्वात कमी (१७%) आहे. बाल कामगार प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले नाहीत.

### ४) शैक्षणिक स्तरानुसार विभागणी:

व्यक्तीच्या सामाजिक विकासाचा मूळ गाभा शिक्षणावर अवलंबून असतो. सरकारने देशात प्रौढ साक्षरता कार्यक्रम राबविला. तसेच सार्वजनिक क्षेत्रातून शिक्षणाच्या सोयी समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यांची अंमलबजावणी योग्य प्रकारे न झाल्यामुळे आजही देशात साक्षरतेचे प्रमाण ७३% आहे. महाराष्ट्रात हे प्रमाण ८२% इतके आहे. म्हणजेच १००% ध्येय गाठता आलेले नाही. संशोधनासाठी निवडलेल्या घरेलू कामगारांची शैक्षणिक माहिती तक्ता क्र. ४ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र.४ शैक्षणिक स्तरानुसार विभागणी**

| शैक्षणिक स्तर | निरक्षर | प्राथमिक | माध्यमिक | उच्च माध्यमिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| कामगारांची संख्या | १६ | ११ | ०७ | ०१ | ३५ |

| शेकडा प्रमाण | ४६ | ३१ | २० | ०३ | १०० |
|---|---|---|---|---|---|

संदर्भ: क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. ४ वरून असे दिसून येते कि, संशोधनासाठी निवडलेल्या कामगारांमधील १६ (४६%) कामगार हे निरक्षर असून सर्वाधिक १९ (५४%) कामगार साक्षर आहेत. साक्षर कामगारांपैकी सर्वाधिक ३१% कामगारांनी प्राथमिक शिक्षण घेतलेले आहे तर, सर्वात कमी (फक्त ०३%) कामगारांनी उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले आहे. यावरून असे लक्षात येते कि, बरेच कामगार निरक्षर आहेत.

**५) कुटुंबातील सदस्य संख्येनुसार विभागणी:**

शहरी भागात कुटुंबाचा आकार शक्यतो लहान आसतो. वाढत्या शहरीकरणामुळे व वाढत्या महागाईमुळे लोकांना लहान कुटुंबाचे महत्व पटते. संशोधनासाठी निवडलेल्या घरेलू कामगारांपैकी कुटुंब सदस्य संख्या मोठी असणाऱ्या कामगारांमध्ये एकत्र कुटुंब असलेल्या कुटुंबाचे प्रमाण अधिक आहे. कामगारांच्या कुटुंबातील सदस्य संख्येविषयी माहिती तक्ता क्र. ५ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र.५ कुटुंबातील सदस्य संख्येनुसार विभागणी**

| कुटुंबातील सदस्य संख्या | ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कामगारांची संख्या | ०२ | ०४ | ०५ | ०९ | ०८ | ०४ | ०२ | ०१ | ३५ |
| शेकडा प्रमाण | ०६ | ११ | १४ | २६ | २३ | ११ | ०६ | ०३ | १०० |

संदर्भ: क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. ५ वरून असे दिसून येते कि, संशोधनासाठी निवडलेल्या कामगारांच्या कुटुंबात कमीत कमी ०१ सदस्य आणि जास्तीतजास्त ०८ सदस्य आहेत. कुटुंबात ०८ सदस्य असणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वात कमी (३%) असून कुटुंबात ०४ सदस्य असणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वाधिक (२६%) आहे. तसेच कुटुंबात ०५सदस्य असणाऱ्या कामगारांचे प्रमाण २३% इतके आहे तर, कुटुंबात ०१ सदस्य असणाऱ्या कामगारांचे प्रमाण ०६% आहे.

**६) घरासंबंधी माहिती:**

व्यक्तीचे घर हे त्याचे राहणीमान दर्शवते. प्रत्येक व्यक्तीची अन्न, वस्त्र प्रमाणे घर ही एक अत्यावश्यक गरज आहे. प्रत्येक व्यक्ती किंवा कुटुंब आपल्या आर्थिक परिस्थितीनुसार घराची सोय करत असते. संशोधनासाठी निवडलेल्या घरेलू कामगारांच्या घरासंबंधी माहिती तक्ता क्र. ६ मध्ये दिलेली आहे.

**ताक्ता क्र. ६ घरासंबंधी माहिती**

| तपशील | घराची मालकी | | घराचे स्वरूप | | | घरातील खोल्या | | | स्वच्छता गृह | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्वत:चे | भाडयाचे | पक्के | कच्चे | | ०१ | ०२ | ०३ | होय | नाही |
| | | | | पत्र्याचे | कौलारू | | | | | |
| कामगारांची संख्या | २३ | १२ | ०३ | ३१ | ०१ | १६ | १७ | ०२ | ०२ | ३३ |
| शेकडा प्रमाण | ६६ | ३४ | ०९ | ८८ | ०३ | ४६ | ४८ | ०६ | ०६ | ९४ |

संदर्भ: क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. ६ वरून असे लक्षात येते कि, संशोधनासाठी निवडलेल्या घरेलू कामगारांपैकी ६६% कामगारांचे स्वतःचे घर आहे तर, ३४% कामगार भाड्याच्या घरांत राहतात. तसेच, ०९% कामगार पक्क्या घरामध्ये राहतात आणि ९१% कामगार कच्च्या घरांमध्ये राहतात.

घरातील खोल्यांचा विचार केल्यास, ४६% घरेलू कामगार एक खोलीच्या घरात राहतात, ४८% कामगार दोन खोल्यांच्या घरात राहतात आणि ०६% घरेलू कामगार तीन खोल्यांच्या घरात राहतात. घरातील खोल्या खूप लहान असल्याचे प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले. तसेच, ०६% कामगारांच्या घरामध्ये स्वच्छता गृहाची सोय आहे तर, ९४% कामगारांच्या घरात स्वच्छता गृहाची सोय नाही.

थोडक्यात, घरेलू कामगारांची राहण्याची व्यवस्था निकृष्ठ दर्ज्याची असल्याचे दिसून येते.

**७) सामाजिक वागणूक:**

घरेलू कामगार हे दारिद्र्यात जीवन जगत असून ते अशिक्षित, अल्पशिक्षित आणि बहूतेक मागास जातीतील आहेत. घरेलू कामगारंचा संबंध कामापुरता असला तरी, घरात एखादी वस्तू सापडत नसते तेव्हा घरेलू कामगारांना पुढे केले जाते. अशा परिस्थितीत या कामगारांना मालक किंवा मालाकीनींकडून कशी वागणूक मिळते, याविषयी माहिती तक्ता क्र. ७ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ७ कामगाराला मिळणारी सामाजिक वागणूक**

| तपशील | कामगाराला सामाजिक प्रतिष्ठा | | | कामगाराला मालक योग्य वागणूक | | | कामगारांवर मालक चोरीचा आरोप | | | कामगाराचा मालक शारीरिक / लैंगिक छळ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आहे | नाही | एकूण | देतात | नाही | एकूण | करतात | नाही | एकूण | करतात | नाही | एकूण |
| कामगारांची संख्या | ३५ | ०० | ३५ | ३० | ५ | ३५ | ०० | ३५ | ३५ | ०० | ३५ | ३५ |
| शेकडा प्रमाण | १०० | ०० | १०० | ८६ | १४ | १०० | ०० | १०० | १०० | ०० | १०० | १०० |

संदर्भ: क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. ७ वरून असे लक्षात येते कि, संशोधनासाठी निवडलेल्या घरेलू कामगारांपैकी सर्व (१००%) कामगारांनाच्या मते, त्यांना समाजात प्रतिष्ठा आहे. ८६% कामगारांना त्यांच्या मालक / मालकीनींकडून योग्य वागणूक मिळते. सर्व (१००%) कामगारांच्या मते, मालक त्यांच्यावर चोरीचा आरोप तसेच शारीरिक / लैंगिक छळ करत नाहीत.

### ८) कामगारांची नाव नोंदणी:

वाढत्या शहरीकरणामुळे घरेलू कामगारांना दिवसेंदिवस मागणी वाढत आहे. परंतु, त्यांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला मिळत नाही म्हणून काही स्वयंसेवी संघानांनी शहरात घरेलू कामगारांच्या संघटना स्थापन केल्या. हळू हळू सरकारनेही असंघटीत मजुरांकडे लक्ष देण्यास सुरवात केली. त्यातूनच घरेलू कामगारांसाठी सरकारने केलेल्या विविध तरतुदी पुढे आल्या. उदा. घरेलू कामगार कायद्यानुसार घरेलू कामगारांची नोंदणी करणे, त्यांना दरमहा किमान रु. ३,४००/- पगार मिळाला पाहिजे, इ. संशोधकाने या संदर्भात मिळवलेली माहिती तक्ता क्र. ८ व ९ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ८ कामगारांची घरेलू कामगार कायद्यांतर्गत नाव नोंदणी**

| तपशील | नाव नोंदणी झाली | | नाव नोंदणी न झाल्याची करणे | कामगारांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | आहे | नाही | १) नोंदणी विषयी माहिती नाही | १९ | ७६ |
| कामगारांची संख्या | १० | २५ | २) केव्हा व कुठे करावी हे माहित नाही | ०५ | २० |
| शेकडा प्रमाण | २९ | ७१ | ३) लिहिता – वाचता येत नाही | ०१ | ०४ |
| | | | एकूण | २५ | १०० |

संदर्भ: क्षेत्रीय पाहणी

**तक्ता क्र. ९ घरेलू कामगार संघटना**

| तपशील | संघटनेचे सभासद | | सभासद नसल्याची करणे | कामगारांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | आहे | नाही | १) संघटनेविषयी माहिती नाही | १७ | ८५ |
| कामगारांची संख्या | १५ | २० | २) सभासद कसे होतात हे माहित नाही | ०२ | १० |
| शेकडा प्रमाण | ४३ | ५७ | ३) लिहिता – वाचता येत नाही | ०१ | ०५ |
| | | | एकूण | २० | १०० |

संदर्भ: क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. ८ वरून असे दिसून येते कि, फक्त २९% कामगारांनी घरेलू कामगार कायद्यांतर्गत नोंदणी केलेली आहे तर, ७१% कामगारांनी सदर नोंदणी केलेली नाही. नोंदणी न करण्याची विविध करणे असून सर्वाधिक ७६% कामगारांना नोंदणी विषयी माहिती नसल्याने त्यांनी नोंदणी केलेली नाही.

तक्ता क्र. ९ वरून असे दिसून येते कि, संशोधनासाठी निवडलेल्या घरेलू कामगारांपैकी ४३% कामगार घरेलू कामगार संघटनेचे सभासद आहेत, तर ५७% कामगार सभासद नाहीत. सभासद नसण्याची विविध करणे असून सर्वाधिक ८५% कामगारांना संघटनेविषयी माहिती नसल्याने ते संघटनेचे सभासद झालेले नाहीत.

थोडक्यात, वरील सर्व बाबींचा विचार केल्यास, घरेलू कामगारांची सामाजिक स्थिती सुधारत असल्याचे दिसून येते.

**घरेलू कामगारांचा आर्थिक अभ्यास:**

व्यक्तीची आर्थिक स्थिती त्यांचे उत्पन्न, राहणीमान, बचतीची सवय, कर्जाचा बोजा, इ. सारख्या बाबींवरून समजते. म्हणून घरेलू कामगारांच्या कुटुंबातील कर्ती सदस्य संख्या, त्यांच्या कामाविषयी सविस्तर माहिती, त्यांचा मासिक पगार, बोनस, कामाचा दर, पगाराव्यातिरिक्त मिळणारे लाभ यासंबंधित आकडेवारी गोळा केलेली आहे. गोळा केलेल्या आधारे घरेलू कामगारांची आर्थिक स्थिती स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**१) कर्ती सदस्य संख्या:**

बहुतांश घरेलु कामगार हे दारिद्र्यात जीवन जगत असतात. त्यामुळे घरातील पुरुषांप्रमाणे स्त्रीयांनाही उत्पन्न मिळविण्यासाठी घराकामासारखी कामे करावी लागतात. संशोधनासाठी निवडलेल्या घरेलू कामगारांच्या कुटुंबातील कर्ती सदस्य संख्या तक्ता क्र. १० मध्ये दर्शवलेली आहे.

**तक्ता क्र. १० कामगारांच्या कुटुंबातील कर्ती सदस्य संख्या**

| सदस्य संख्या | ०१ | ०२ | ०३ | ०४ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| कामगारांची संख्या | ०५ | १९ | ०८ | ०३ | ३५ |
| शेकडा प्रमाण | १४ | ५४ | २३ | ०९ | १०० |

संदर्भ: क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. १० वरून असे दिसून येते कि, कुटुंबातील कर्ती सदस्य संख्या ०२ असणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वाधिक (५४%) आहे तर, कुटुंबातील कर्ती सदस्य संख्या ०४ असणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वात कमी (०९%) आहे. घरेलू कामगार आपल्या मुलांना कामावर घेऊन जात नसल्याचे प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले.

**२) कामाचा कालावधी:**

घरेलू कामगार हे गरिबीत दिवस काढत असतात. त्यामुळे त्यांना मिळणाऱ्या उत्पन्नातून घर खर्च व आवश्यक अशा मुलभूत गोष्टींवरील खर्च भागवणे कठीण जाते. या व अशा अनेक कारणांमुळे शहरातील बऱ्याच गरीब कुटुंबातील स्त्रियांना घरेलू काम करून उत्पन्न मिळवावे लागते. बरेच कामागर लहानपणापासूनच हे काम करत आले आहेत. संशोधनासाठी निवडलेल्या कामगारांचा कामाचा कालावधी तक्ता क्र. ११ मध्ये दर्शवलेला आहे.

**तक्ता क्र. ११ घर कामगार म्हणून कामाचा कालावधी**

| कामाचा कालावधी (वर्षे) | ०१-०५ | ०६-१० | ११-१५ | १६-२० | २०-२५ | २६-३० | ३०< | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कामगारांची संख्या | १० | ०७ | ०३ | ०५ | ०४ | ०२ | ०४ | ३५ |
| शेकडा प्रमाण | २९ | २० | ०९ | १४ | ११ | ०६ | ११ | १०० |

संदर्भ: क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. ११ वरून असे लक्षात येते कि, ०१ ते ०५ वर्षे घरेलू कामगार म्हणून काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वात जास्त (२९%) असून २६ ते ३० वर्षे घरेलू कामगार म्हणून काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वात कमी (०६%) आहे. तसेच, ३० पेक्षा जास्त वर्षे घरेलू कामगार म्हणून काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण ११% आहे. कुटुंबाचा खर्च भागविण्यासाठी काही घरेलू कामगारांना आयुष्यभर घरेलू काम करावे लागत असल्याचे प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले.

### ३) घरेलू काम करण्याची करणे:

संशोधनासाठी निवडलेल्या घरेलू कामगारांनी उत्पन्नाचे साधन म्हणून घरेलू काम स्वीकारण्याची करणे तक्ता क्र. १२ मध्ये दिलेली आहेत.

**तक्ता क्र. १२ घरेलू कामगार म्हणून काम स्वीकारण्याची करणे**

| अ.क्र. | करणे | कामगारांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | विधवा असल्यामुळे | ०६ | १७ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | पती व्यसनाधीन असल्यामुळे | ०३ | ०९ |
| ३ | मुलांच्या शिक्षणासाठी | ०६ | १७ |
| ४ | वाढती महागाई | ०६ | १७ |
| ५ | उत्पन्नाचे दुसरे साधन नाही | १४ | ४० |
| | **एकूण** | **३५** | **१००** |

संदर्भ: क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. १२ वरून असे दिसून येते कि, सर्वाधिक (४०%) कामगारांच्या अंगात दुसरे कोणतेही कसब नसल्याने त्यांच्याकडे घरेलू कामाशिवाय उत्पन्नाचे इतर कोणतेही साधन उपलब्ध नव्हते. म्हणून ते घरेलू काम करतात. तसेच, पती व्यसनाधीन असल्यामुळे घरेलू काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वात कमी (०३%) आहे. तर, विधवा असल्यामुळे, मुलांच्या शिक्षणासाठी व वाढती महागाई या कारणांमुळे घरेलू काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण समान (प्रत्येकी १७%) आहे.

**४) दररोजची कामाची ठिकाणे (घरे):**

घरेलू कामगारांना धुणं धुणे, भांडी घासणे, घर झाडणे व लादी पुसणे, घराची इतर साफसफाई करणे, स्वयंपाक करणे यासारखी कामे करवी लागतात. अशा कामांपासून त्यांना कमी मोबदला मिळतो. त्यामुळे बहुतांश घरेलू कामगारांना एकापेक्षा जास्त घरांमध्ये काम करावे लागते. संशोधानासाठी निवडलेल्या घरेलू कामगारांना दररोज किती घरांमध्ये काम करावे लागते, याविषयी माहिती तक्ता क्र. १३ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. १३ रोज काम करत असलेल्या घरांची माहिती**

| **घरांची संख्या** | ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०७< | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **कामगारांची संख्या** | ०४ | ०३ | ०७ | ०७ | ०५ | ०५ | ०२ | ०२ | **३५** |
| **शेकडा प्रमाण** | ११ | ०९ | २० | २० | १४ | १४ | ०६ | ०६ | **१००** |

संदर्भ: क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. १३ वरून असे दिसून येते कि, संशोधनासाठी निवडलेले घरेलू कामगार रोज कमीतकमी ०१ व जास्तीतजास्त ०९ घरांमध्ये काम करतात. रोज ०३ ते ०४ घरांमध्ये काम करणाऱ्या घरेलू कामगारांचे प्रमाण सर्वाधिक (४०%) आहे तर, रोज ०२ घरांमध्ये काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वात कमी (०९%) आहे. तसेच, ८८% कामगार रोज ०१ ते ०६ घरांमध्ये काम करतात आणि फक्त १२% कामगार रोज ०६ पेक्षा जास्त घरांमध्ये काम करतात. थोडक्यात, कुटुंबाचा दैनंदिन खर्च भागविण्यासाठी काही घरेलू कामगारांना जास्त घरांमध्ये काम करावे लागते.

## ५) कामाची वेळ:

काही घरेलू कामगारांना सकाळी, काही घरेलू कामगारांना संध्याकाळी, तर काहींना दोंन्ही वेळेस काम करावे लागते. संशोधनासाठी निवडलेल्या घरेलू कामगारांच्या कामाच्या वेळेसंबंधी माहिती तक्ता क्र. १४ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. १४ कामगारांच्या कामाची वेळ**

| कामाची वेळ | पूर्णवेळ | अर्धवेळ | एकूण | सकाळ | संध्याकाळ | सकाळ व संध्याकाळ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **कामगारांची संख्या** | ०२ | ३३ | **३५** | ३३ | ०० | ०० | **३३** |
| **शेकडा प्रमाण** | ०६ | ९४ | **१००** | १०० | ०० | ०० | **१००** |

संदर्भ: क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. १४ वरून असे दिसून येते कि, संधोशानासाठी निवडलेल्या ३५ घरेलू कामगारांपैकी ०२ (०६%) कामगार पूर्णवेळ कामगार असून ३३ (९४%) कामगार अर्धवेळ कामगार आहेत. तसेच, सर्व (१००%) अर्धवेळ कामगार फक्त सकाळी कामाला जात असून संध्याकाळी अथवा दोंन्ही वेळेस कामाला जाणारे कामगार प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले नाहीत.

## ६) जास्तीचे काम:

घरेलू कामगारांना त्यांच्या नियोजित कामाव्यतिरिक्त इतरही कामे कधी कधी करावी लागतात. संशोधनासाठी निवडलेल्या घरेलू कामगारांना कराव्या लागणाऱ्या जास्तीच्या कामांविषयी माहिती तक्ता क्र. १५ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. १५ कामगारांना करावे लागणारे जास्तीचे काम**

| तपशील | जास्तीचे काम करावे लागते | | जास्तीच्या कामाचे कारण | | | | जास्तीच्या कामाचा मोबदला मिळतो | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | नाही | सण / समारंभ | पाहुणे येणे | सुट्टीचा दिवस | एकूण | होय | नाही |
| **कामगारांची संख्या** | २१ | १४ | ११ | ०८ | ०२ | २१ | ०९ | १२ |
| **शेकडा प्रमाण** | ६० | ४० | ५२ | ३८ | १० | **१००** | ४३ | ५७ |

संदर्भ: क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. १५ वरून असे दिसून येते कि, संशोधनासाठी निवडलेल्या घरेलू कामगारांपैकी सर्वाधिक ६०% कामगारांना जास्तीचे काम करावे लागते. जास्तीचे काम करावे लागणाऱ्या कामगारांपैंकी सर्वात जास्त (५२%) कामगारांना सण/समारंभाच्या वेळी जास्तीचे काम करावे लागते, तर सर्वात कमी (१०%) कामगारांना घर मालकांच्या सुट्टीच्या दिवशी जास्तीचे काम करावे लागते. परंतु, फक्त ४३% (०९) कामगारांना जास्तीच्या कामाचा मोबदला मिळतो, तर ५७% (१२) कामगारांना जास्तीच्या कामाचा मोबदला मिळत नाही.

### ७) प्रतिदिन कामाचे तास व मासिक पगार:

घरेलू कामगारांचे कामाचे तास हे ते किती घरांमध्ये काम करतात यावर अवलंबून असते. तसेच, त्यांचा मासिक पगार हा ते किती घरांमध्ये व कोणते काम करतात यावर अवलंबून असतो. इतर कामांच्या तुलनेत स्वयंपाक करणाऱ्या कामगारांना त्यांच्या कामाचा जास्त मोबदला मिळत असल्याचे दिसून आले. संशोधनासाठी निवडलेल्या घरेलू कामगारांना प्रतिदिन किती तास काम करावे लागते आणि त्यांना या कामासाठी मासिक पगार किती मिळतो याविषयी माहिती तक्ता क्र. १६ मध्ये दर्शवलेली आहे.

**तक्ता क्र. १६ कामगारांचे प्रतिदिन कामाचे तास आणि मासिक पगार**

| अ.क्र. | प्रतिदिन कामाचे तास | कामगारांची संख्या | शेकडा प्रमाण | मासिक पगार (रु.) | कामगारांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०२ | ०४ | ११.४३ | १००० पर्यंत | ०२ | ०५.७१ |
| २ | ०३ | ०७ | २०.०० | १००१-२००० | ०६ | १७.१४ |
| ३ | ०४ | ०९ | २५.७१ | २००१-३००० | ११ | ३१.४३ |
| ४ | ०५ | ०६ | १७.१४ | ३००१-४००० | ०८ | २२.८६ |
| ५ | ०६ | ०३ | ०८.५७ | ४००१-५००० | ०३ | ०८.५७ |
| ६ | ०७ | ०३ | ०८.५७ | ५००१-६००० | ०३ | ०८.५७ |
| ७ | ०८ | ०२ | ०५.७२ | ६००१-७००० | ०१ | ०२.८६ |
| ८ | ०९ | ०१ | ०२.८६ | ७००१-८००० | ०१ | ०२.८६ |
| | एकूण | ३५ | १०० | एकूण | ३५ | १०० |

संदर्भ: क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. १६ वरून असे दिसून येते कि, घरेलू कामगारांना प्रतिदिन कमीतकमी ०२ आणि जास्तीतजास्त ०९ तास काम करावे लागते. तसेच, प्रतिदिन ०४ तास काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वाधिक (२५.७१%) आहे, तर प्रतिदिन ०९ तास काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वात कमी (०२.८६%) आहे.

मासिक पगाराचा विचार केल्यास, रु. २००१/- ते रु. ३०००/- दरम्यान मासिक पगार मिळवणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वात जास्त (३१.४३%) आहे, तर मासिक पगार रु. ६०००/- च्या वर आणि रु. १०००/- पर्यंत मिळवणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वात कमी (प्रत्येकी ५.७१%) आहे.

८) **बोनस:**

बोनस हा पगाराचा एक भाग मनाला जातो. आज सर्वच संघटीत आणि असंघटीत कामगारांना बोनस मिळतो. किमान एक वर्ष सेवा झाली असेल तर, दिवाळीच्यावेळी मालकांनी घरेलू कामगारांना "एक महिन्याचा पगार" बोनस म्हणून देण्याची कायद्यात तरतूद आहे. घरेलू कामगारांना मिळणाऱ्या बोनसविषयी माहिती तक्ता क्र. १७ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. १७ कामगारांना मिळणारा वार्षिक बोनस**

| तपशील | बोनस मिळतो | | बोनस (रु.) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | नाही | १०० | २०० | ३०० | ५०० | ६०० | कपडे | एकूण |
| कामगारांची संख्या | ११ | २४ | ०२ | ०४ | ०२ | ०६ | ०१ | ०९ | २४ |
| शेकडा प्रमाण | ३१ | ६९ | ०८ | १७ | ०८ | २५ | ०४ | ३८ | १०० |

संदर्भ: क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. १७ वरून असे दिसून येते कि, संशोधनासाठी निवडलेल्या एकूण घरेलू कामगारांपैकी फक्त ११ (३१%) कामगारांना बोनस मिळतो, तर २४ (६९%) कामगारांना बोनस मिळत नाही. तसेच, नविन कपडे बोनस म्हणून मिळणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वाधिक (३८%) आहे, रु. ६००/- बोनस म्हणून मिळणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वात कमी (०४%) आहे आणि रु. ५००/- बोनस म्हणून मिळणाऱ्या कामगारांचे प्रमाण २५% इतके आहे.

**९) पगारवाढ:**

संघटीत आणि असंघटीत अशा साधारणतः सर्वच कामगारांना दरवर्षी पगारवाढ देण्यात येते. संशोधनासाठी निवडलेल्या घरेलू कामगारांना मिळणाऱ्या पगारवाढ विषयी माहिती तक्ता क्र. १८ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. १८ कामगारांना मिळणारी दरमहा पगारवाढ**

| तपशील | पगारवाढ मिळते | | पगारवाढ (रु.) | | |
|---|---|---|---|---|---|
| | होय | नाही | ५० | २०० | एकूण |
| कामगारांची संख्या | ०८ | २७ | ०४ | ०४ | ०८ |
| शेकडा प्रमाण | २३ | ७७ | ५० | ५० | १०० |

संदर्भ: क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. १८ वरून असे दिसून येते कि, संशोधनासाठी निवडलेल्या एकूण घरेलू कामगारांपैकी फक्त ०८ (२३%) कामगारांना दरवर्षी पगारवाढ मिळते, तर २७ (७७%) कामगारंना दरवर्षी पगारवाढ मिळत नाही. तसेच, दरवर्षी पगारवाढ मिळणाऱ्या कामगारांपैंकी अर्ध्या (५०%) कामगारांना रु. ५०/- इतकी पगारवाढ मिळते आणि अर्ध्या (५०%) कामगारांना रु. २००/- इतकी पगारवाढ मिळते. घरेलू कामगार सतत मागणी करूनही त्यांना घरमालक पगारवाढ देत नाहीत, असे प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले.

### १०) पगाराव्यतिरिक्त मिळणारे लाभ:

संशोधनासाठी निवडलेल्या घरेलू कामगारांना त्यांच्या घर मालकाकडून पगाराव्यतिरिक्त मिळणाऱ्या इतर लाभाविषयी माहिती तक्ता क्र. १९मध्ये दिलेली आहे. इतर लाभांमध्ये चहा, नाष्टा, जेवण इत्यादी लाभांचा समावेश होतो.

**तक्ता क्र. १९ कामगारांना मालकांकडून पगाराव्यतिरिक्त मिळणारे लाभ**

| तपशील | लाभ मिळतात | | पगाराव्यतिरिक्त मिळणारे लाभ | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | होय | नाही | चहा | चहा व नाष्टा | चहा, नाष्टा व जेवण | एकूण |
| कामगारांची संख्या | ३४ | ०१ | २१ | १२ | ०१ | ३४ |
| शेकडा प्रमाण | ९७ | ०३ | ६२ | ३५ | ०३ | १०० |

संदर्भ: क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. १९ वरून असे दिसून येते कि, संशोधनासाठी निवडलेल्या एकूण घरेलू कामगारांपैकी ३४ (९७%) कामगारांना पगाराव्यतिरिक्त इतर लाभ मिळतात. त्यापैकी सर्वाधिक (६२%) कामगारांना त्यांच्या घर मालकाकडून रोज फक्त चहा मिळतो, तर सर्वात कमी (०३%) कामगारांना त्यांच्या घर मालकाकडून रोज चहा, नाष्टा आणि जेवण मिळते. चहा, नाष्टा आणि जेवण इ. लाभ मिळणारे कामगार पूर्णवेळ कामगार असल्याचे प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले. तसेच, १२ (३५%) कामगारांना चहा व नाष्टा इ. लाभ मिळतात.

**११) दरमहा बचत:**

घरेलू कामगार हे दारिद्र्यात जीवन जगत असतात. त्यांना दरमहा मिळणारे उत्पन्न त्यांच्या कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी अपुरे पडत असते. तरीदेखील आजारपणात औषधोपचारासाठी काही घरेलू कामगार बचत करत असतात. संशोधनासाठी निवडलेल्या घरेलू कामगारांच्या बचातीविषयी माहिती तक्ता क्र. २० मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. २० कामगारांच्या बचतीचे स्वरूप**

| तपशील | बचत करतात | | बचतीचे स्वरूप | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | नाही | १०० | २०० | ५०० | १००० | २००० | एकूण |
| कामगारांची संख्या | ०७ | २८ | ०१ | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०७ |
| शेकडा प्रमाण | २० | ८० | १४.२९ | ४२.८६ | १४.२९ | १४.२८ | १४.२८ | १०० |

संदर्भ: क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. २० वरून असे दिसून येते कि, संशोधनासाठी निवडलेल्या एकूण घरेलू कामगारांपैकी फक्त २०% कामगाराच बचत करतात आणि ८०% कामगार इच्छा असून देखील बचत करू शकत नाहीत. तसेच, बचत करत असलेल्या कामगारांपैकी सर्वाधिक ४२.८६% कामगार रु. २००/- इतकी दरमहा बचत करतात, तर रु.१००/-, रु.५००/०,

रु.१०००/- व रु.२०००/- इतकी दरमहा बचत करणाऱ्या कामगारांचे प्रमाण प्रत्येकी १४.२८% आहे.

**१२) कर्ज:**

घरेलू कामगारांना मिळणारे उत्पन्न फार कमी असते. त्यामुळे दैनंदिन खर्च भागावानेही त्यंना कठीण जाते. म्हणून त्यंना त्यंच्या दैनंदिन खर्चाव्यातीरिक्त खर्च उदा. घराची दुरुस्ती करणे, कुटुंबाचा वैद्यकीय खर्च भागवणे, लग्न कार्य किंवा इतर कौटुंबिक कार्य पार पडणे, इ. भागविण्यासाठी कर्ज काढावे लागते. घरेलू कामगारांच्या कर्जाविषयी माहिती तक्ता क्र. २१ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. २१ कामगारांच्या कर्जाबद्दल माहिती**

| तपशील | कर्ज घेतले | | कामगारांच्या कर्जाची रक्कम (रु. हजारात) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | आहे | नाही | ११-२० | २१-३० | ३१-४० | ४०< | एकूण |
| कामगारांची संख्या | १३ | २२ | ०४ | ०५ | ०२ | ०२ | १३ |
| शेकडा प्रमाण | ३७ | ६३ | ३०.७८ | ३८.४६ | १५.३८ | १५.३८ | १०० |

संदर्भ: क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. २१ वरून असे दिसून येते कि, संशोधनासाठी निवडलेल्या ३७% कामगारांनी कर्ज घेतलेले आहे, तर सर्वाधिक ६३% कामगारांनी कर्ज घेतलेले नाही. कर्ज घेतलेल्या कामगारांपैकी बहुतांश कामगारांनी बचत गटांकडून कर्ज घेतले असल्याचे प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले. तसेच, काही कामगारांनी २ ते ३ वेगवेगळे कर्ज घेतले असल्याचेही प्रत्यक्ष पाहणीत समजले. रु. २१ ते ३० हजार दरम्यान कर्ज घेतलेल्या कामगारांचे प्रमाण सर्वाधिक (३८.४६%) आहे आणि रु. ३० हजार पेक्षा जास्त व रु. २१ हजार पेक्षा कमी रक्कमेचे कर्ज घेणाऱ्या कामगारांचे प्रमाण समान (प्रत्येकी ३०.७८%) आहे.

**संशोधनाचे निष्कर्ष:**

सदर संशोधनासाठी केलेल्या सर्वेक्षणावर आधारित निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

**अ) धुळे शहरातील घरेलू कामगारांची सामाजिक स्थिती:**

१) सर्व घरेलू कामगारांची कुटुंबे स्थानिक असून एकाही घरेलू कामगाराचे कुटुंब बाहेरून धुळे शहरात स्थलांतरित झालेले नाही.

२) प्रगत जातीतील घरेलू कामगारांचे प्रमाण खूप कमी (११%) असून मागास जातीतील कामगारांचे प्रमाण सर्वाधिक (८९%) आहे. मागास जातीतील कामगारांमध्ये एन.टी. जातीच्या कामगारांचे प्रमाण सर्वात जास्त (३४%) असून एस.बी.सी. जातीतील कामगारांचे प्रमाण सर्वात कमी (०३%) आहे.

३) १८ वर्षे ते ५० वर्षे वयोगटातील कामगारांचे प्रमाण सर्वाधिक (८३%) असून ५१ वर्षे ते ६५ वर्षे वयोगटातील कामगारांचे प्रमाण सर्वात कमी (१७%) आहे. बाल कामगार प्रत्यक्ष पाहणीत आढळले नाहीत, ही आनंदाची बाब आहे.

४) ४६% घरेलू कामगार निरक्षर असून ५४% कामगार साक्षर आहेत. साक्षर कामगारांपैकी ३१% कामगारांनी प्राथमिक शिक्षण घेतलेले आहे. थोडक्यात, ७७% कामगार अशिक्षित व अल्प शिक्षित असून माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या कामगारांचे प्रमाण २३% आहे.

५) कुटुंबातील सदस्य संख्या ०१ ते ०५ दरम्यान असणाऱ्या कामगारांचे प्रमाण ८०% असून कुटुंबातील सदस्य संख्या ०५ पेक्षा जास्त असणाऱ्या कामगारांचे प्रमाण २०% आहे. थोडक्यात, घरेलू कामगारांनाही कुटुंब नियोजनाचे महत्व पटत असल्याचे दिसते.

६) ६६% कामगार स्वतःच्या घरांमध्ये राहत असले तरी, ९१% कामगारांची घरे कच्ची आहेत. तसेच, ९४% कामगार ०१ ते ०२ खोल्यांच्या घरात राहत असून त्या खोल्या अतिशय लहान आहेत. आणि ९४% कामगारांच्या घरात स्वच्छता गृहाची सोय नाही. थोडक्यात, बहुतांश घरेलू कामागारांची राहण्याची व्यवस्था निकृष्ट दर्ज्याची असल्याचे दिसून येते.

७) संशोधनासाठी निवडलेल्या सर्व घरेलू कामगारांच्या मते, त्यांना समाजात प्रतिष्टा आहे. तसेच, घर मालक त्यांच्यावर चोरीचा आरोप करत नाही आणि त्यांचा शारीरिक किंवा

लैगिक छळही करत नाही. ८६% कामगारांच्या मते, घरमालक त्यांना योग्य वागणूक देतात. थोडक्यात, घरेलू कामगारांना योग्य सामाजिक वागणूक मिळते.

८) संशोधनासाठी निवडलेल्या कामगारांपैकी ७१% कामगारांनी घरेलू कामगार कायद्यांतर्गत नोंदणी केलेली नसून त्यापैकी ७६% कामगारांना नोंदणीविषयी माहितीच नाही. तसेच, ५७% कामगारांनी घरेलू कामगार संघटनेत नोंदणी केलेली नसून त्यापैकी ८५% कामगारांना संघटनेविषयी माहितीच नाही.

थोडक्यात, वरील सर्व बाबींचा विचार केल्यास धुळे शहरातील बहुतांश घरेलू कामगारांची सामाजिक स्थिती सुधारत असल्याचे दिसून येते.

**ब) धुळे शहरातील घरेलू कामगारांची आर्थिक स्थिती:**

१) कुटुंबातील कर्ती सदस्य संख्या ०२ ते ०३ असणाऱ्या कामगारांचे प्रमाण ६८% असून कर्ती सदस्य संख्या ०३ ते ०४ असणाऱ्या कामगारांचे प्रमाण ३२% आहे. घरेलू कामगार आपल्या मुलांना घरेलू काम करण्यासाठी पाठवत नसून त्यांना शिकवत असल्याचे प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले, ही आनंदाची बाब आहे.

२) ०१ ते २० वर्षे घरेलू कामगार म्हणून काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण ७२% असून २० वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासून घरेलू कामगार म्हणून काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण २८% आहे. कुटुंबाचा खर्च भागविण्यासाठी काही घरेलू कामगारांना आयुष्यभर घरेलू काम करावे लागत असल्याचे प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले.

३) एकूण घरेलू कामगारांपैकी ४०% कामगारांच्या अंगात दुसरे कोणतेही कसब नसल्याने त्यांच्याकडे घरेलू कामाशिवाय उत्पन्नाचे इतर कोणतेही साधन उपलब्ध नव्हते. म्हणून ते घरेलू काम करत असल्याचे दिसून आले. तर, विविध कौटुंबिक कारणांमुळे घरेलू काम करावे लागत असणाऱ्या कामगारांचे प्रमाण ६०% आहे.

४) एकूण घरेलू कामगारांपैकी ८८% कामगार रोज ०१ ते ०६ घरांमध्ये काम करतात आणि फक्त १२% कामगार रोज ०६ पेक्षा जास्त घरांमध्ये काम करतात. थोडक्यात, कुटुंबाचा दैनंदिन खर्च भागविण्यासाठी काही घरेलू कामगारांना जास्त घरांमध्ये काम करावे लागते.

५) एकूण घरेलू कामगारांपैकी ०६% कामगार पूर्णवेळ कामगार असून ९४% कामगार अर्धवेळ कामगार आहेत. तसेच, सर्व अर्धवेळ कामगार फक्त सकाळी कामाला जात असून संध्याकाळी अथवा दोन्ही वेळेस कामाला जाणारे कामगार प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले नाहीत.

६) एकूण घरेलू कामगारांपैकी ६०% कामगारांना नियोजित कामाव्यतिरिक्त जास्तीचे काम करावे लागते. त्यापैकी बहुतांश (५२%) कामगारांना सण / समारंभाच्यावेळी जास्तीचे काम करावे लागते. परंतु, फक्त ४३% कामगारांना जास्तीच्या कामाचा मोबदला मिळतो, तर ६०% कामगारांना मोबदला मिळत नाही.

७) ०२ ते ०६ तासांदरम्यान काम करणाऱ्या घरेलू कामगारांचे प्रमाण ८३% असून ०६ तासांपेक्षा जास्त वेळ काम करणारे फक्त १७% कामगार आहेत. म्हणजेच, बहुतांश कामगार ०६ तासंपेक्षा कमी वेळ काम करतात.

८) रु. ४,०००/- पर्यंत मासिक उत्पन्न मिळवणाऱ्या कामगारांचे प्रमाण ७७% असून रु. ४,०००/- पेक्षा जास्त मासिक उत्पन्न मिळवणाऱ्या कामगारांचे प्रमाण २३% आहे. थोडक्यात, बहुतांश कामगारांना कमी मासिक उत्पन्न मिळते.

९) कायद्यात तरतूद असून देखील बहुतांश (६९%) कामगारांना त्यांच्या घर मालकाकडून बोनस मिळत नाही. तसेच, बोनस मिळणाऱ्या कामगारांपैकी सर्वाधिक ३८% कामगारांना बोनस म्हणून मालकाकडून कपडे दिले जातात.

१०) संशोधनासाठी निवडलेल्या एकूण घरेलू कामगारांपैकी फक्त २३% कामगारांना दरवर्षी पगारवाढ मिळते, तर ७७% कामगारंना दरवर्षी पगारवाढ मिळत नाही. तसेच, दरवर्षी पगारवाढ मिळणाऱ्या कामगारांपैंकी अर्ध्या (५०%) कामगारांना रु. ५०/- इतकी पगारवाढ मिळते आणि अर्ध्या (५०%) कामगारांना रु. २००/- इतकी पगारवाढ मिळते. घरेलू कामगार सतत मागणी करूनही त्यांना घरमालक पगारवाढ देत नाहीत, ही दुःखद बाब आहे.

११) एकूण घरेलू कामगारांपैकी ९७% कामगारांना पगाराव्यतिरिक्त इतर लाभ मिळतात. त्यापैकी सर्वाधिक (६२%) कामगारांना त्यांच्या घर मालकाकडून रोज फक्त चहा मिळतो, तर सर्वात कमी (०३%) कामगारांना त्यांच्या घर मालकाकडून रोज चहा, नाष्टा आणि

जेवण मिळते. चहा, नाष्टा आणि जेवण इ. लाभ मिळणारे कामगार पूर्णवेळ कामगार असल्याचे प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले. तसेच, १२ (३५%) कामगारांना चहा व नाष्टा इ. लाभ मिळतात.

१२) संशोधनासाठी निवडलेल्या एकूण घरेलू कामगारांपैकी फक्त २०% कामगाराच बचत करतात आणि ८०% कामगार इच्छा असून देखील बचत करू शकत नाहीत. तसेच, बचत करत असलेल्या कामगारांपैंकी सर्वाधिक ४२.८६% कामगार रु. २००/- इतकी दरमहा बचत करतात, तर रु.१००/-, रु.५००/०, रु.१०००/- व रु.२०००/- इतकी दरमहा बचत करणाऱ्या कामगारांचे प्रमाण प्रत्येकी १४.२८% आहे.

१३) संशोधनासाठी निवडलेल्या ३७% कामगारांनी कर्ज घेतलेले आहे, तर सर्वाधिक ६३% कामगारांनी कर्ज घेतलेले नाही. कर्ज घेतलेल्या कामगारांपैकी बहुतांश कामगारांनी बचत गटांकडून कर्ज घेतले असल्याचे प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले. तसेच, काही कामगारांनी २ ते ३ वेगवेगळे कर्ज घेतले असल्याचेही प्रत्यक्ष पाहणीत समजले. रु. २१ ते ३० हजार दरम्यान कर्ज घेतलेल्या कामगारांचे प्रमाण सर्वाधिक (३८.४६%) आहे थोडक्यात, बहुतांश कामगारांनी कर्ज घेतलेले नाही, असे दिसून आले.

थोडक्यात, वरील सर्व बाबींचा विचार केल्यास, धुळे शहरातील बहुतांश घरेलू कामगारांची आर्थिक स्थिती बिकट असून ती सुधारत असल्याचे दिसून येते.

**उपाययोजना:**

**अ) सरकारने करावयाच्या उपाययोजना:**

१) बहुतांश घरेलू कामगारांची आर्थिक स्थिती बिकट आहे. त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी त्यांच्या मुलांना उच्च शिक्षण देणे आवश्यक आहे. परंतु, गरिबीमुळे कामगारांना असे करणे शक्य होत नाही. म्हणून सरकारने लवकरात लवकर बंद पडलेली शैक्षणिक सहाय्यता योजना सुरु करावी.

२) महाराष्ट्र राज्य घरेलू कामगार कल्याण मंडळाने घरेलू कामगारांच्या मुलांसाठी कैशल्य विकास कार्यक्रम राबविणे, विदेशी भाषा प्रशिक्षण केंद्र चालविणे, यशवंत चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत पदवी अभ्यासक्रम उपलब्ध करून देणे, इ. करण्याचे योजिले आहे. या

सर्व योजना शक्य तेवढ्या लवकर सरकारने अमलात आणाव्या. त्यामुळे या मुलांचा शैक्षणिक दर्जा उंचावून त्यांना चांगल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि त्यांच्या आईचे घर काम करणे थांबेल.

३) सरकारने घरेलू कामगारांसाठी विविध कैशल्य विकास आणि प्रशिक्षण कार्यक्रम राबवावे. त्यामुळे घरेलू कामांसोबत इतरही कामे करून कामगारांना त्यांचे उत्पन्न वाढविता येईल.

४) घर कामगारांच्या मुलांसाठी सरकारने नोकरीत आरक्षण दिले पाहिजे.

५) सरकारने घरेलू कामगारांचा समावेश प्राधान्य क्षेत्र करावा. त्यमुळे घरेलू कामगारांना बँकेकडून सवलतीचे कर्ज उपलब्ध होईल आणि त्यंना स्वतःची उन्नती करता येईल.

६) घरेलू कामगार कायद्यांतर्गत जास्तीतजास्त घरेलू कामगारांनी नोंदणी करावी. यासाठी नोंदणीमुळे कामगारांना मिळणाऱ्या सवलती व फायदे याविषयी कामगारांमध्ये आणखीन जागृती सरकारने करावी.

७) सरकारने कामगारांच्या हितासाठी ज्या योजना सुरु केल्या आहेत, त्याविषयी कामगारांमध्ये अधिक जनजागृती करावी. त्यामुळे जास्तीतजास्त कामगार या योजनांचा लाभ घेऊ शकतील. उदा. राष्ट्रीय विमा योजना, ग्राम स्वच्छता अभियान,इ.

८) राज्य सरकारने घरेलू कामगारांसाठी सुरु केलेल्या अंत्यविधी सहाय्य, प्रसूती लाभ, जनश्री विमा योजना, सन्मान धन योजना,इ. पुन्हा कार्यान्वित कराव्यात व त्यांची प्रभावीपणे अमलबजावणी करावी.

९) घरेलू कामगारांच्या राज्य, जिल्हा व तालुका पातळीवर सरकारने विविध संघटना स्थापन कराव्यात. त्यामुळे जेव्हा या कामगारांची पिळवणूक तेव्हा या संघटनांच्या माध्यमातून त्यांना आवाज उठवता येईल. आणि झालेल्या अन्यायाविरोधात न्याय मागण्यासही मदत होईल.

१०) घरेलू कामगारांसाठी सरकारने राज्य, जिल्हा व तालुका पातळीवर स्वतंत्र तक्रार निवारण यंत्रणा निर्माण करावी व ती प्रभावीपणे राबवावी. त्यामुळे या कामगारांचे प्रश्न मार्गी लागण्यास गती मिळेल.

११) सरकारने घरेलू महिला कामगारांसाठी भरपगारी बाळंतपणाची राजा द्यावी. त्यामुळे या कामगारांना नोकरीची शाश्वती राहील.

**ब) कामगार संघटनेने करावयाच्या योजना:**

१) सन्मान धन योजना, घरेलू कामगारांच्या मुलांसाठी शैक्षणिक अर्थसहाय्य इ. यासारख्या शासनाच्या बंद पडलेल्या योजना पुन्हा सुरु करण्यासाठी शासनाकडे कामगार संघटनांनी पाठपुरावा करावा.

२) घरेलू कामगारांच्या विकासासाठी विविध कैशल्य विकास कार्यक्रम राबवावेत.

३) घरेलू कामगारांच्या गरजा व अडचणी या वेळोवेळी जाणून घेऊन त्या शासनापुढे वेळोवेळी मांडाव्यात व त्यांचा पाठपुरवा करावा. त्यामुळे कामगारांचे प्रश्न लवकरात लवकर सुटण्यास मदत होईल.

४) शासनाच्या विविध योजना व सवलतींबाबत घरेलू कामगारांमधील गैरसमज व अज्ञानता दूर करण्यासाठी प्रयत्न करावेत. त्यमुळे शासनाच्या योजनांचा लाभ जास्तीतजास्त कामगारांना होईल.

**क) घर मालकांनी करावयाच्या उपाययोजना:**

१) काही कामगारांचा पगार वेळेवर होत नाही. अशा घर मालकांनी त्यांच्या कामगारांचा पगार वेळेवर व नियमित करावा. त्यामुळे कामगारांना त्यांचा मासिक खर्च भागविणे शक्य होईल.

२) प्रत्येक घर मालकाने त्यांच्या घरेलू कामगारांना कायद्यात नमूद केल्याप्रमाणे किमान पगार द्यावा. तसेच, त्यांना सामाजिक व आर्थिक न्याय भूमिकेतून पगारवाढ द्यावी.

३) बहुतांश घरेलू कामगारांना दरवर्षी बोनस मिळत नाही. प्रत्येक घर मालकाने त्यांच्या घारेलू कामगाराला दरवर्षी ‘एक महिन्याचा पगार’ बोनस म्हणून द्यावा.

४) घर मालकाने त्याच्या घरेलू कामगाराकडून नियोजित कामापेक्षा जास्तीचे काम करवून घेतल्यास त्या कामाचा ज्यादा मोबदला कामगाराला द्यावा. आणि हा मोबदला शक्यतो आर्थिक स्वरुपात असावा.

५) प्रत्येक घर मालाक्रे त्याच्या घरेलू कामगाराला किमान एक दिवसाची भरपगारी साप्ताहिक सुट्टी द्यावी. तसेच, घरेलू कामगार हा पूर्णवेळ कामगार असेल तर त्याला वर्षातून एकदा १५ दिवसांची भात्पागरी सुट्टी द्यावी. त्यामुळे ते त्यांच्या गावाला जाऊ शकतील.

६) घर मालकांनी त्यांच्या महिला घरेलू कामगाराला बाळंतपाणाची भरपगारी राजा द्यावी.

७) घर मालकांनी त्यंच्या घर्व्लू कामगारांसाठी भविष्य निर्वाह निधीची सोय करावी. त्यामुळे त्यांचेही भविष्य सुरक्षित होईल.

८) घरेलू कामगार किंवा त्याचे कुटुंब सदस्य आजारी असल्यास घर मालकाने वैद्यकीय खर्चासाठी त्यांच्या घरेलू कामगाराला अर्थसहाय्य करावे.

९) काही घरेलू कामगारांना कामावर जाताना प्रवास खर्च करावा लागतो. अशा कामगारांना त्यांच्या घर मालकाने प्रवास खर्च द्यावा.

१०) घर मालकांनी त्यांना शक्य असेल तेवढे शैक्षणिक अर्थसहाय्य त्यांच्या घरेलू कामगारांच्या मुलांसाठी करावे. उदा. शैक्षणिक साहित्य किंवा पुस्तके इ.

**ड) घरेलू कामगारांनी करावयाच्या उपाययोजना:**

१) घरेलू कामगार कामावर सुट्टी घेणार असल्यास आगाऊ एक दिवस घ मालकांना कळवले पाहिजे. तसेच, घर मालकांना जो वेळ दिला असेल त्यावेळेचे बंधन पाळले पाहिजे.

२) घर्व्लू कामगारांनी त्यांचे काम दर्जेदार व गुणसंपन्न कसे होईल याचा प्रयत्न करावा. म्हणजे मालक वर्ग खुश होऊन घरेलू कामगारांना इतर सवलती देण्यास तयार होतात.

३) घरेलू कामगार जर जास्त दिवस कामावर जाणार नसेल तर त्याने पर्यायी कामगाराची सोय करावी व त्याबाबत घ मालकाला आगाऊ कळवावे. त्यामुळे घर मालकांची गैरसोय होणार नाही आणि घर मालक त्य्नाच्या घरेलू कामगाराला चांगली वागणूक देतील.

४) घरेलू कामगारांनी आपले वर्तन चांगले ठेवावे व प्रामाणिकपणे काम करावे. त्यामुळे घर मालक व घरेलू कामगार यांच्यात सलोख्याचे संबंध राहतील आणि घर मालकांचा त्यांच्या घरेलू कामगारांवर विश्वास निर्माण होईल.

५) घरेलू कामगारांनी त्यंना शक्य तेवढी बचत नियमितपणे करावी.त्यामुळे कामगारांना बचतीची सवय लागेल आणि भविष्यात याचा फायदा त्यांना होईल.

६) घरेलू कामगारांनी स्वतःच्या शिक्षणाबाबतही स्वारस्य दाखवावे. वेगवेगळ्या प्रशिक्षण कार्यक्रमांचा लाभ घेऊन स्वतःतील गुणकौशल्ये विकसित करावी किंवा नविन कौशल्ये आत्मसात करावीत. त्यामुळे उत्पन्नाचे नविन मार्ग त्यांना उपलब्ध होतील व त्यांचे राहणीमान सुधारण्यास मदत होईल.

७) घरेलू कामगारांनी राज्य व केंद्र सरकारच्या विविध योजना व सवलतींविषयी संपूर्ण माहिती करून घेऊन त्यांचा जास्तीतजास्त लाभ घ्यावा. त्यामुळे कामगारांची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल. उदा. अटळ पेन्शन योजना, जन-धन योजना, ग्राम स्वच्छता अभियान, सरकारच्या विविध विमा योजना, इ.

८) घरेलू कामगारांनी घरेलू कामगार कायद्यांतर्गत नाव नोंदणी करावी. त्यमुळे कामगारांना त्याचे सर्व फायदे मिळतील. उदा. जनश्री विमा योजना, राष्ट्रीय स्वस्थ विमा योजना, सन्मान धन योजना आणि महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाने दिलेले इतर लाभ.

९) घरेलू कामगारांनी घरेलू कामगार संघटनेत अथवा इतर कोणत्याही कामगार संघटनेत नव नोंदणी करावी. त्यामुळे संघटनेचे फायदे कामगारांना मिळतील. उदा. कामगारांना त्यांच्या तक्रारी व मागण्या संघटनेच्या माध्यमातून सरकारपुढे मांडता येतील.

## संदर्भग्रंथ :

१) घरेलू कामगार कल्याण आणि सामाजिक सुरक्षितता कायदा, २०१०, भारत सरकार.

२) घरेलू कामगार कृती समितीचा अंतिम अहवाल, १२ सप्टेंबर, २०११ कमगार व रोजगार मंत्रालय, भारत सरकार.

३) डॉ. एस.जी.शिंदे, “असंघटीत क्षेत्रातील कामगार: मोलाकाराणींची स्थिती”, वाणिज्य विद्या, जर्नल ऑफ कॉमर्स अँन्ड मॅनेजमेंट थॉट – मरठी पूरक, खंड ३, अंक ३, जुलै २०१४.

४) The Domestic Workers (Welfare and Regulation of Employment) Bill 2015, bill no. 21 of 2015, Government of India.

५) The Domestic Workers (Registration Social Security and Welfare) Act, 2008, Government of India.

६) महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाचा लाभार्थी म्हणून नोंदानिसाठीचा अर्ज, नमुना-च [नियम ९(१) नुसार].